पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३३ • सप्टेंबर २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती – www.punecorporation.org

## महानगरपालिका सेवकांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न

कामगार कल्याण निधीतर्फे सभासद सेवकांच्या ज्या पाल्यांनी सन २०१३ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेमध्ये ६५% व त्यापेक्षा जादा गुण प्राप्त केले अशा पाल्यांचा गुणगौरव समारंभ दिनांक २१/९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. कामगार कल्याण निधीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या गुणगौरव समारंभासाठी प्रसृत करण्यात आलेल्या कार्यालय परिपत्रकास अनुसरुन इयत्ता दहावीमधील ११२ सभासद सेवकांनी व इयत्ता बारावीमधील १४ सभासद सेवकांनी त्यांच्या पाल्यांचा गुणगौरव करणेसाठी अर्ज सादर केले होते.

सदर समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. विवेक सावंत, व्यवस्थापकीय संचालक, एम.के.सी.एल उपस्थित होते. तसेच, मा. ज्ञानेश्वर मोळक, सह महापालिका आयुक्त, मा. सुनिल पारखी, नगर सचिव, श्री. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, श्री. तुकाराम जगताप, जॉ. सेक्रेटरी, पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस निधीचे कार्याध्यक्ष तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी प्रमुख पाहुण्यांचे शॉल व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये कामगार कल्याण निधीमार्फत सभासद सेवकांसाठी अनेक स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत असून, सभासद व त्यांच्या कुटुंबियांना प्रोत्साहन मिळणेसाठी या गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन कल्याण निधीमार्फत करण्यात येत असल्याचे मा.दौंडकर यांनी नमूद केले. कामगार कल्याण निधी हा कामगार आणि प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नातून उभारला असून, या निधीतून अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून सभासद सेवक व त्यांचे कुटुंबिय यांचा विविध कार्यक्रमामधून सहभाग वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे मा. दौंडकर यांनी प्रतिपादन केले.

तदनंतर मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मा. जगताप यांनी त्यांच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी वेळेचे नियोजन करणे ही बाब अत्यावश्यक असून वेळेचे नियोजन केल्यास कोणतेही साध्य सहज साध्य करता येते. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन केले. तसेच, सर्व उपस्थित पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

तदनंतर मा. विवेक सावंत, व्यवस्थापकीय संचालक, एम.के.सी.एल यांनी इयत्ता दहावी व बारावीनंतरच्या पुढील कारकिर्दीविषयी पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मा. विवेक सावंत यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सर्वप्रथम सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दहावी बारावीनंतर नवीन जगाला सामोरे जायचे आहे. दहावीतील २१ अपेक्षित प्रश्नसंच आता संपले असून, यापुढील आयुष्यात २१ अनपेक्षित प्रश्नांचा सामना करावयाचा आहे. यापुढे अनपेक्षित प्रश्न कसे सोडवायचे याबाबत नियम तयार करावेत. छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये सत्कार होणे ही अतिशय सन्मानाची बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत चातुर्याने आपली आग्र्याहून सुटका करुन घेतली. या वेळी त्यांचेबरोबर सुरक्षा रक्षक किती होते, प्रमुख कोण होते, कोणत्या पेटाऱ्यामधून त्यांनी सुटका करुन घेतली, याची माहिती पुस्तकामध्ये दिलेली आहे. याचा अभ्यास न करता आपण स्वत: त्यांच्या जागी असतो तर आपण आपली सुटका कशी करुन घेतली असती, याचा विचार करणे गरजेचे आहे. या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आपली विचाराची दिशा ठरवावी.

शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनाची माहिती पाठ करण्यापेक्षा आपण त्या जागी असतो तर आपण कोणते संशोधन केले असते याचा विचार करावा. प्रत्येक प्रश्नाचे प्रत्येकाचे उत्तर वेगळे असणार आहे. प्रत्येक व्यक्तीच्या नवीन ज्ञानाला महत्व प्राप्त झाले आहे. जुनी सर्व माहिती गुगलवर उपलब्ध आहे. त्यामुळे आपण नवनवीन गोष्टींचे संशोधन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

एकदा गेलेली गोष्ट जगात परत कधीही मिळवता नाही, ती म्हणजे वेळ. वेळेचे नियोजन अचूक करणे अत्यंत आवश्यक आहे. जीवनातील सर्वात मोठे ध्येय साध्य करण्यासाठी महत्वाचा वेळ राखून ठेवावा. त्यानंतर इतर गोष्टींसाठी वेळ देण्यात यावा. आपल्याला काय आवडते हे प्रथम शोधावे. हीच करियरची पहिली पायरी आहे. एखादी गोष्ट आपल्याला जमते, आवडते आणि समाज त्यासाठी मोबदला द्यायला तयार आहे या सर्व गोष्टी एकत्र आल्या तरच त्याला करियर म्हणता येईल. एखाद्या विषयामध्ये प्राविण्य मिळवायचे असेल तर त्यासाठी किमान दहा हजार तासांचा सराव करावा लागेल. यासाठी लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर आणि बिल गेट्स यांचे उदाहरण त्यांनी दिले. कोणत्याही गोष्टीचा सराव अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारे मा. विवेक सावंत यांनी विविध उदाहरणे देवून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

तदनंतर सत्कारार्थी विद्यार्थ्यांना हॅवर सॅक बक्षिस दिली. या कार्यक्रमात काही पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन करणेकामी सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील सर्व सेवकांनी विशेष परिश्रम घेतले.





## पुणे मनपास इंडियाज बेस्ट २०१३ स्कोच पुरस्कार प्रदान

पुणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनास इंडियाज बेस्ट २०१३ स्कोच ॲवॉर्ड प्रदान करण्यात आला. या ॲवॉर्डसाठी प्लॅनिंग कमिशन, भारत सरकार नॉलेज पार्टनर होते व पंचायती राज मंत्रालय, कामगार व रोजगार मंत्रालय, डिपार्टमेंट ऑफ पोस्ट, शहर विकास मंत्रालय, डिपार्टमेंट ऑफ डिसॲबिलिटि ऑफ अफेअर्स, नॅशनल इनफोरमॅटिक सेंटर अशा खात्यांचे सहाय्य मिळाले. स्कोज डिजीटल इन्क्लूजन ॲवॉर्ड २०१३ साठी संपूर्ण देशभरातून शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, आर्थिक सेवा देणाऱ्या संस्था इत्यादींमार्फत प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. या ॲवॉर्डकरिता १००० प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी १५० प्रवेशिकांना दिनांक ४ ते ६ ऑगस्ट, २०१३ या कालावधीत दिल्ली येथे सादरीकरणाकरिता बोलाविण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी पाच विभागांमध्ये प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशन (स्वच्छ संस्था) शून्य कचरा प्रभाग व बायोगॅस प्रकल्प या विषयाबाबतच्या कामाचे सादरीकरण करण्यात आले. यातून ३५ प्रवेशिकांचे सादरीकरण दिनांक २/९/२०१३ रोजी दिल्ली येथे घेण्यात आले. दिनांक ३/९/२०१३ रोजी या बक्षिसाचे वितरण करण्यात आले. पुणे महानगरपालिकेच्या वतीने मा. महापौर सौ. वैशाली बनकर यांनी सदर पुरस्कार स्विकारला. मा.श्री.सुरेश जगताप, सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, मा. प्रमोद यादव, विशेष कार्याधिकारी (प्रकल्प) घनकचरा व्यवस्थापन या कार्यक्रमास उपस्थित होते.



## संपादकीय...

### कार्यालयीन परिपत्रकांची समज

पुणे महानगरपालिकेतील विविध कार्यालयांकडून प्रशासकीय कामकाजाबाबत वेळोवेळी कार्यालय परिपत्रके प्रसृत करण्यात येतात. सदरहु कार्यालय परिपत्रके ही पुणे महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाबाबत होणारे बदल/विशिष्ट बाबतीत करावयाची कार्यवाही/माहिती/कार्यक्रम/निमंत्रण, इत्यादी बाबत असतात. त्यामुळे अशा कार्यालय परिपत्रकांची समज सर्व खातेप्रमुख/विभाग प्रमुख यांनी आपल्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक असते व अशा कार्यालय परिपत्रकांवर सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक असते.

तथापि, बहुतांश खात्यांमध्ये कार्यालय परिपत्रकाची समज संबंधित सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात येत नाही व सदर कार्यालय परिपत्रकांवर सेवकांची स्वाक्षरी घेण्यात येत नाही. यास्तव सर्व अधिकारी/सेवकांना कार्यालय परिपत्रकातील माहिती होत नाही. त्यामुळे असे अधिकारी/कर्मचारी सदर कार्यालय परिपत्रकातील सूचनांपासून किंवा माहितीपासून वंचित राहतात व त्यांच्या संधी गमावल्या जातात.

उपरोक्त पध्दतीमुळे पुणे महानगरपालिकेने राबविलेल्या उपक्रमांचा लाभ पुरेशा कर्मचाऱ्यांना होत नाही. तसेच, ज्या सेवकांना अशा परिपत्रकांची समज देण्यात येत नाही परंतु ज्यांना अशा उपक्रमांमध्ये भाग घ्यावयाचा असतो किंवा त्या स्वरुपाचे काम करावयाचे असते असे सेवक संबंधित कार्यालयांकडे समज न मिळाल्याबाबत तक्रार करतात. याबाबत प्रत्येक खात्याने दखल घेणे आवश्यक आहे.

बहुदा असे निदर्शनास येते की, कार्यालय परिपत्रके, कार्यालयीन आदेश प्रसृत झाल्यानंतर ज्या कार्यालयांमध्ये ते उपलब्ध होतात तेथील विभाग प्रमुख/अधिक्षक/कार्यालय अधिक्षक/सरलेखनिक इत्यादी कर्मचारी सदर कार्यालय परिपत्रक वाचून त्यांच्या कार्यालय परिपत्रक फाईलला जोडतात. मात्र त्याची समज इतर कर्मचाऱ्यांना देण्यात येत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या सांख्यिकी व संगणक विभागाने कार्यालय परिपत्रके सर्व संबंधित खातेप्रमुखांच्या ई-मेलवर पाठविण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार कार्यालय परिपत्रके तात्काळ संबंधित खात्याच्या खातेप्रमुखांना उपलब्ध होतात. अशी कार्यालय परिपत्रके ताबडतोब त्यांच्या कार्यालयातील विभाग प्रमुखांना आदेश देवून त्याची समज सर्व कर्मचाऱ्यांना देण्याची व्यवस्था केल्यास उपरोक्त प्रश्न निर्माण होणार नाहीत.

विशेषत: मनपा भवन मुख्य इमारत व स्थानिक संस्था कर कार्यालयाची इमारत या ठिकाणी तात्काळ कार्यालय परिपत्रके दिली जातात. तथापि, क्षेत्रीय कार्यालये व त्यांच्या अखत्यारीतील विविध कोठ्या, कार्यालये येथील कर्मचाऱ्यांना कार्यालय परिपत्रकांची समज दिली जात नाही. तसेच, आरोग्य कार्यालयाकडील विविध दवाखान्यांतील कर्मचाऱ्यांना कार्यालय परिपत्रके उपलब्ध करुन दिली जात नाहीत. याबाबत वेळोवेळी संबंधित सेवक तक्रार घेवून येत असतात. अशा बाबतीत ज्या खात्यांच्या अंतर्गत विविध उप विभाग कार्यरत आहेत त्या ठिकाणी संबंधित मुख्य खात्याने कार्यालय परिपत्रकांच्या प्रती करुन त्यांच्या संबंधित उप विभागांना त्याची समज देण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत कार्यालय परिपत्रकाची समज दिली जाईल.

कार्यालय परिपत्रकाची समज प्रत्येक कर्मचाऱ्याला दिल्यास त्याच्या ज्ञानात व कार्यक्षमतेमध्ये वाढ होणार आहे. कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतील अद्ययावत माहिती उपलब्ध होवून त्यांचा काम करण्यामधील वेळ वाचणार आहे. या बाबी विचारात घेवून सर्व खातेप्रमुखांनी जी कार्यालय परिपत्रके दैनंदिन कामकाजासंबंधी सुधारणा करणारी किंवा निर्देश देणारी असतील अशी कार्यालय परिपत्रके वेगळी गठित करुन ती मुळ फाईल म्हणून जतन करुन ठेवली पाहिजेत. जेणेकरुन कामकाजामध्ये होणारा वेळोवेळीचा बदल हा कर्मचाऱ्यांना ताबडतोब लक्षात येईल.

उपरोक्त पध्दतीने कार्यालय परिपत्रकांबाबत कामकाज केल्यास प्रत्येक सेवकास कार्यालयीन परिपत्रकाची समज होईल व पुणे महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये गती येण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या प्रत्येक उपक्रमाची माहिती संबंधित सेवकांना दिली जाईल व पुणे महानगरपालिकेचे सर्व उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण होण्यास मदत होईल.

## मनोगत

माझा जन्म दिनांक १८ सप्टेंबर, १९५५ रोजी सोलापूर येथे झाला. माझे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सोलापूर येथेच झाले. वडिल लहानपणी गेल्याने आईने संपूर्ण घराचा भार सांभाळत शिक्षण पूर्ण केले. माझे महाविद्यालयीन शिक्षण मी काम करीत पूर्ण केले व बी.कॉम.पर्यंत पदवी धारण केली. नोकरीकरिता खूप प्रयत्न करत होतो. मला सेवायोजन कार्यालयाकडून कॉल आल्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ऑफिसमध्ये सोलापूर येथे दिनांक १/६/१९८१ रोजी नोकरी लागली. त्या ठिकाणी काम करीत असताना दिनांक १/४/१९८६ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुणे लष्कर पाणीपुरवठा यथे सोलापूरहून बदली झाली व दिनांक १५/८/१९८९ पासून पुणे महानगरपालिकेत खऱ्या अर्थाने आमच्या सेवेची सुरुवात झाली.

प्रथमत: पुणे महानगरपालिकेतील नेमणूक ही पाणीपुरवठा विभागात असल्याने या विभागात मी पगार बिल लेखनिकाचे काम करीत होतो. त्या ठिकाणी मला काम करीत असताना सेवकांची पेन्शनची कामे, वारस नोकरीची कामे पगार बिलाबरोबर करावी लागत होती. तदनंतर पाणीपुरवठा विभागाकडून माझी बदली आयातकर कार्यालयाकडे झाली व आयातकर कार्यालयाकडून माहे सप्टेंबर, २००३ रोजी माझी बदली सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे झाली. त्यानंतर माझ्या कामाला वेगळी कलाटणी प्राप्त झाली.

सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे बदली झाल्यावर त्याच वेळेला मा. श्री. दौंडकर साहेब व मा. श्री. खिलारी साहेब हे कामगार कल्याण अधिकारी म्हणून कामावर हजर झाले व त्या दिनांकापासून मला मा. दौंडकर साहेबांचा सहवास लाभत गेला.

सुरुवातीस सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे मर्यादित काम होते. परंतु पुणे महानगरपालिका कामगार कल्याण निधीस ऑगस्ट, २००५ रोजी शासनाची मान्यता प्राप्त झाली व त्यानंतर सल्लागार (कामगार) कार्यालय नावारुपास येवू लागले.

कामगार कल्याण निधी हा नव्याने स्थापन झाल्यामुळे त्याच्या कामकाजाची रुपरेषा, कामकाज, पत्रव्यवहार हा नव्याने सरु होत असल्याने या कामाची जबाबदारी माझ्यावर देण्यात आली. या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामामध्ये प्रथमत: पुणे मनपामधील मयत सेवकांना रु. १५,०००/- वारस अनुदान देणेबाबतचे कार्य सुरु करण्यात आले. प्रथम वर्ष असल्याने या वर्षात गुणवंत कामगार पुरस्कार, विविध क्रिडा स्पर्धा, इत्यादी उपक्रम राबवित



असताना माझी तारांबळ उडत होती. असा संपूर्ण निधीच्या कामकाजाची माहिती व पत्रव्यवहार हा संपूर्णपणे मा. दौंडकर साहेबांनी माझ्याकडून करवून घेतला व वेळोवेळी त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी काम करीत होतो. निधीचे काम करीत असताना मला बऱ्याच मोठ्या व्यक्तिंचा सहवास लाभला. मा. उल्हासदादा पवार, मा. विजय भटकर, मा. नरेंद्र जाधव, मा. मोहन धारिया, मा. नबाब मलिक, इत्यादी मान्यवरांचा यामध्ये समावेश आहे.

निधीचे कामकाज सुरु असताना सल्लागार (कामगार) कार्यालयामधील सेवापूर्ती समारंभ या कार्यक्रमाची देखील नव्याने सुरुवात झाली. प्रथमत: ती जबाबदारी माझ्यावर होती. नंतर या कार्यालयातील श्री. जयवंत शिंदे यांना जबाबदारी सोपविण्यात आली. सुररुवातीस सेवकांना लाल गुलाबाचे पुष्प देवून सत्कार करण्यात आला व नंतर अंदाजपत्रकामध्ये तरतूद करुन स्मृतिचिन्ह व शॉल देण्याची प्रथा सुरु करण्यात आली.

कामगार दिंडीबाबतची मुळ संकल्पना ही मा. दौंडकर साहेबांची. सन २००४ पासून यास सुरुवात झाली. त्या वेळी मी मा. दौंडकर साहेब व अन्य मित्र परिवारामार्फत या दिंडीची सुरुवात केली. या दिंडीस महापालिकेचे बरेच अधिकारी व सेवक वैयक्तिकरित्या जात असत. या सर्वांना घेवून आपण दिंडी सुरु करावी अशी संकल्पना जोडण्यात आली व त्या वेळी तत्कालीन सल्लागार (कामगार) श्री. नंदकिशोर जगताप साहेब यांनी दुजोरा दिला व ही दिंडी सुरुवातीस १०-१५ सेवकांनी मिळून सुरु केली. वर्षानुवर्षे पदक्रमण करीत असताना या दिंडीची संख्या वाढत गेली. या दिंडीत सहभागी होणाऱ्या सेवक वारकरी बंधुंच्या चहानाश्टा, जेवणाची व्यवस्थाच्या करणारे सेवक ही पुंढे आले. श्री. मधुकर नरसिंगे व मित्र परिवार, श्रीमती भारतीबाई व परिवार हे दिंडीत लोकांची आजतागायत चहापानाची व्यवस्था करीत असून श्री.रमेश काथवटे, श्री. शिवाजी घारे, श्री. सिद्राम सिंदगी, श्री. सोलंकी व मी स्वत: संपूर्ण जेवणाची व्यवस्था श्री राम सोसायटीमध्ये श्री. काथवटे यांचे निवासस्थानी करीत आहे. या कामगार दिंडीचा वटवृक्ष करण्यामागे मा. दौंडकर साहेब यांचा सिंहाचावाटा आहे.

माझ्या सेवेच्या काळात तत्कालीन सेवकवर्ग विभाग अधिकारी मा. दौंडकर साहेब यांनी माझी बदली सेवकवर्ग विभागामध्ये सन २००९ मध्ये केली व त्या वेळेपासून सेवानिवृत्तीपर्यंत मी या विभागात काम करीत आहे. माझ्या पदोन्नतीबाबत देखील साहेबांनी स्वत: लक्ष घालून माझी सिनिअर ग्रेड लेखनिक पदावर सकवकवर्ग विभागातच माझ्या या सेवाकाळात माझ्या जीवनाला कलाटणी ही सल्लागार (कामगार) कार्यालयातून मिळाली. त्या वेळेपासून मी नावारुपाला आलो. सदर ठिकाणी काम करताना माझ्यावर आलेली संकटे व अडचणी या स्वत: दौंडकर साहेबांनी सोडविल्या व माझा मार्ग सुकर केला.

मला घडविण्यात नावारुपाला आणण्याचे संपूर्ण श्रेय हे मा. दौंडकर साहेबांना असून, मी त्यांचा शतश: ऋणी आहे. मा. दौंडकर साहेब आपणास कोटी कोटी प्रणाम!

**श्री. अशोक ढगे**
**सेवकवर्ग विभाग**

### विवेकानंदांचे उपदेश

१. जो आज्ञेचे पालन करणे जाणतो तोच आज्ञा देणेही जाणतो. प्रथम आज्ञेचे पालन करावयास शिका. आपल्याला संघटनेची आवश्यकता आहे. संघटना हीच शक्ती आहे आणि आज्ञाधारकपणा हेच तिचे रहस्य आहे.

२. ज्यांना मानवजातीला साहाय्य करावेसे वाटते त्यांनी आधी आपल्या सुखदु:खांचे, नावलौकिकांचे आणि सर्व प्रकारच्या स्वार्थी भावनांचे गाठोडे बांधून ते समुद्रात फेकून दिले पाहिजे आणि मगच भगवंताकडे गेले पाहिजे. जगातील साऱ्या महापुरुषांनी हेच सांगितले आणि हेच केले.

३. जर काही भले व्हावे अशी तुमची इच्छा असेल तर आपल्या या बाह्य अनुष्ठानांना तिलांजली द्या आणि जिवंत ईश्वराची, मानव-देहाची-ज्याने मानवरुप धारण केले आहे, अशा प्रत्येक जीवाची-भगवंताच्या समष्टी तसेच व्यष्टी रुपाची पूजा करा.

## पुणे महानगरपालिका माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार वितरित

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या वतीने राजीव गांधी अॅकेडमी ऑफ ई-लर्निंग स्कुल येथे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ संपन्न झाला. सदर समारंभासाठी मा. श्री. दिनकर पाटील, शिक्षण सह संचालक, एस.सी.ई.आर.टी., पुणे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

तसेच, मा. सौ. वैशाली मराठे, अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. समारंभासाठी मा.सौ. शारदाताई ओरसे, उपाध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती, मा. सौ. विजयाताई वाडकर, मा. सौ. अस्मिताताई शिंदे, नगरसेविका, मा.श्री. उल्हास उर्फ आबा बागुल, मा. श्री. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ व मा. सौ. मिनाक्षी राउत, शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण उपस्थित होते.

माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या वतीने या वर्षापासून आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याची योजना मा. सौ. मिनाक्षी राउत यांनी सुरु केली.

अध्यक्षपदावरुन बोलताना मा. श्री. दिनकर पाटील यांनी ज्ञानाने परिपूर्ण व अद्ययावत शिक्षकच उद्याची सक्षम पिढी घडवू शकतील, असे नमूद केले.

या प्रसंगी पुढील एक मुख्याध्यापक व पाच शिक्षक यांना



शॉल, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले.

सौ. ताहेराबेगम इनामदार, मुख्याध्यापिका, स्वातंत्र्य सेनानी हकीम अजमलखान उर्दू माध्यमिक विद्यालय, सौ. छाया निकम, सहाय्यक शिक्षिका, महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, श्री. सुरेश सोनवणे, सहाय्यक शिक्षक, श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला, सौ. नीता गुळवणी, सहाय्यक शिक्षिका, हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालय, श्री. दत्तात्रय नाईक, सहाय्यक शिक्षक, नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय, सौ. आरेफा शेख, सहाय्यक शिक्षिका, मौलाना मोहमंद अली जोहर उर्दू विद्यानिकेतन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. मिनाक्षी राउत, शिक्षणाधिकारी यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. मदन व्हावळ, शिक्षक यांनी केले.

## कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ८५-८६ चे शानदार उद्घाटन

सन २०१३-१४ मध्ये अनुक्रमे वर्ग ३ व ४ मधील सेवकांसाठी आयोजित कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.८५-८६ चा उद्घाटन समारंभ दिनांक २३/९/२०१३ रोजी जुने कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय इमारत, कसबा पेठ येथे पार पडला. सदर प्रशिक्षण वर्गास ५८ सेवकांना प्रवेश देण्यात आला आहे. वर्ग क्र. ८५ साठी श्री. विठ्ठल जगदाळे व वर्ग क्र. ८६ साठी श्रीमती तनुजा रावळ यांची कामगार शिक्षक म्हणून तर समन्वयक म्हणून कामगार कल्याण अधिकारी श्री. नितीन केंजळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यक्रमास मा.प्रा.डॉ.धनंजय लोखंडे, संचालक तथा विभाग प्रमुख, प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग हे उद्घाटक म्हणून लाभले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आद्य कामगार नेते कै. नारायण मेघाजी लोखंडे यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी मा. अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, मा. श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा.श्री. प्रशांत एडवी, कामगार शिक्षण अधिकारी, केंद्रीय शिक्षण मंडळ श्री. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, श्री. तुकाराम जगताप, सल्लागार, पीएमसी एम्प्लॉईज युनियन तसेच कामगार शिक्षक उपस्थित होते.

मा. अरुण खिलारी यांनी आपल्या प्रस्तावनेत प्रशिक्षणार्थींना कामगार प्रशिक्षण योजनेबाबतची माहिती दिली. तसेच, कामगार प्रशिक्षण वर्ग सुरु



करण्यामागची भूमिका विषद करुन प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्याबाबत शुभेच्छा दिल्या.

तदनंतर श्री. प्रकाश जाधव, श्री. बापू पवार व श्री. प्रशांत एडवी यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

तदनंतर प्रमुख पाहुणे मा. धनंजय लोखंडे यांनी आपल्या भाषणामध्ये पुणे मनपालिकेतर्फे राबविण्यात येणारा कामगार प्रशिक्षण वर्ग हा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद करुन प्रशिक्षण कार्यक्रम यापुढेही सुरु ठेवणेबाबत सदिच्छा व्यक्त केल्या. श्री. लोखंडे यांनी कामगार व त्यांच्या हक्कांबाबत माहिती दिली. तसेच, सर्व प्रशिक्षणार्थींना कामगार प्रशिक्षणाबाबत शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती तनुजा रावळ, कामगार शिक्षिका व आभारप्रदर्शन श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले.

## आई वडिलांना विसरु नका

दुसरे सारे काही विसरा परंतु आईवडिलांना विसरु नका.  
त्यांचे उपकार अगणित आहेत, त्यांना विसरु नका.  
त्यांनी असह्य अशा वेदना सहन केल्या, तेंव्हाच आपण पृथ्वी पाहू शकलो.  
त्या पूज्यजनांचे हृदय, तुम्ही दगड बनून ठेचू नका.  
आपल्या मुखातील घास तुम्हाला देवून त्यांनी तुम्हास मोठे केले,  
ज्यांनी अमृत पाजले, त्यांना विष पाजू नका.  
ज्यांनी तुमचे खूप लाड केले, गोड कौतुक केले,  
त्या कोडकौतुक पुरविणाऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यास विसरु नका.  
जसे कराल तसे भराल, ही भावना विसरु नका.  
जिने भिजलेल्या कपड्यांवर झोपून तुम्हांस सुक्या कपड्यांवर निजविले,  
तिच्या स्नेहार्द डोळ्यात अश्रू येतील असे वागू नका.  
ज्यांनी तुमच्या मार्गात प्रेमाची फुलेच पसरली  
त्यांच्या मार्गातील काटे बनू नका.  
पैसे खर्चून सर्व काही मिळेल, पण आई वडिल मिळणार नाहीत.  
त्यांच्या पूज्य चरणांची आठवण ठेवा, त्यांना कधी विसरु नका.

**संकलन : श्रीमती शुभांगी आल्हाट, सल्लागार (कामगार) कार्यालय**

## ५ सप्टेंबर - शिक्षक दिन

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर रोजी जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. शिक्षक हा भावी पिढीचा शिल्पकार असून त्यांच्याकडूनच आपल्याला ज्ञान व जगाकडे पाहण्याची सकारात्मकदृष्टी मिळत असते. आपल्या गुरु, शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस... डॉ. राधाकृष्णन यांचे शिक्षकांप्रती असलेले प्रेम व आदर पाहून भारत सरकारने त्यांचा जन्मदिन हा शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. ती परंपरा अजूनही सुरु आहे व भविष्यातही सुरुच राहील. १९६२ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेंव्हा त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याचे त्यांनी सांगितले होते. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर, १९८८ रोजी मद्रासजवळील तिरुणी येथे झाला. ते ब्राह्मण कुळातील असल्याने त्यांच्या घरात नेहमी धार्मिक विधी केला जात असे. त्या धार्मिक वातावरणातच ते लहानाचे मोठे झाले. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण केली. तत्वज्ञान हा त्यांचा आवडता विषय असल्याने त्यांनी या विषयात पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी मद्रासच्या एका महाविद्यालयात नोकरी केली. नोकरी करत असतानाही त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांनी वेदांतातील नीतिशास्त्र या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांच्या प्रबंधास विद्यापीठाने सर्वोत्तम प्रबंध म्हणून जाहीर करुन त्यांचा गौरव केला. एक उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून स्वतःची साऱ्या जगाला ओळख करुन दिली. कुशल व्यक्तिमत्व व इंग्रजी भाषेवर असलेल्या त्यांच्या प्रभुत्वामुळे पार परदेशात त्यांची प्रशंसा झाली. ऑक्सफर्ड विद्यापीठातही ते नीतिशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होते. शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरुचे स्थान आहे. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होवू शकत नाही. आज शिक्षणाचे अवमुल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. तसेच, गुरु-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना लोप पावत आहे. या संबंधामधील पावित्र्य कायम ठेवण्यासाठी व डॉ. राधाकृष्णन यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो. शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा घटक आहे. भविष्यातले विचारवंत, कलाकार, लेखक, तत्वज्ञ, पुढारी, डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनीयर, शास्त्रज्ञ तयार करण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला कुंभार आकार देवून त्यापासून एखादी प्रतिकृती तयार करत असतो, अगदी त्याचप्रमाणे शिक्षक बालकांच्या कोऱ्या मनावर योग्य संस्कार करुन त्यातून भविष्यातील जबाबदार नागरिक घडवित असतात. आपल्या आईवडिलांनंतर शिक्षक हे आपले अप्रत्यक्षरित्या पालकच असतात. शिक्षक हे आपल्याला केवळ पुस्तकी ज्ञान शिकवित नाहीत तर आपण त्यांच्याकडून जगण्याची कला आत्मसात करत असतो. आपल्या व्यक्तीमत्वावर त्यांच्याकडून संस्कार, संस्कृती, परंपरा, चालीरीती व आदर असे पैलू पाडले जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुंचा नेहमी आदरपूर्वक सन्मान केला पाहिजे. त्यांच्याविषयी शिक्षक दिनी कृतज्ञता व्यक्त करुन त्यांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## हसा

साहेब सेविकेस : आपले कार्यालय रोज सकाळी दहा वाजता सुरु होते. तुम्ही रोज कार्यालयात उशिरा येता.

सेविका : नाही. मी वेळेवर कार्यालयात येते.

साहेब : कसे?

सेविका : मी कार्यालयात येण्यासाठी रोज बरोबर दहा वाजता घरुन निघते.

# माहे सप्टेंबर, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३०/९/१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे सप्टेंबर, १३ मधील सेवानिवृत्त २५ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १७ वयपरत्वे व ८ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री प्रशांत एडवी, कामगार शिक्षण अधिकारी, केंद्रीय शिक्षण मंडळ हे उपस्थित होते. तसेच, मा. डॉ. किशोर पाखरे, सहाय्यक परवाना प्रमुख मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी हे उपस्थित होते. प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांना त्यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व देय रकमांचा योग्य विनियोग करणेबाबत मार्गदर्शन करुन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



मा.पाखरे यांनी सर्व सेवानिवृत्त सेवकांना वैद्यकीय सेवेचा लाभ घेण्याबाबत व पुढील आयुष्यासाठी मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. सेवापूर्ती समारंभ सुरु करण्यामध्ये ज्यांनी परिश्रम घेतले असे सेवक श्री. अशोक ढगे या कार्यक्रमात सेवानिवृत्त झाले.

तदनंतर प्रमुख पाहुणे मा. एडवी यांनी महानगरपालिकेने सुरु केलेला उपक्रम हा खूप चांगला उपक्रम असून अशा स्वरुपाचा कार्यक्रम इतर कोणत्याही ठिकाणी मला पहायला मिळालेला नाही. महानगरपालिका त्यांच्या सेवेतील वर्ग १ ते ४ मधील सर्व सेवकांचा सन्मान करते. ही बाब कौतुकास्पद आहे, असे नमूद करुन त्यांना मिळणाऱ्या देय रकमांबाबत दक्षता घेणेबाबत मार्गदर्शन केले व सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सेवानिवृत सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अलका जोशी यांनी व आभार प्रदर्शन श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री. राजपुरे,श्री. घोलप, श्री. गेजगे, श्री. मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.


कल्याणवार्ता
सप्टेंबर, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


# गणेशविद्या

व्यासांच्या मागणीवरुन गणपतीने महाभारत लिहिताना ज्या नव्या लिपीत लिहिले, ती मानवी इतिहासातील सर्वात आधुनिक आणि सर्वाधिक सोयीची लिपी आहे. या लिपीत एक कोटींहून अधिक जोडाक्षरे बनवता येत असून आपण आजवर त्यातील काही हजार जोडाक्षरेच वापरली आहेत. देवाने नागरिकांसाठी बनवलेली लिपी या समजुतीने तिला देवनागरी लिपी म्हणतात. या लिपीला गणेशविद्या किंवा बाळबोध लिपी असेही म्हणतात.

या लिपीत १६ स्वर, ३६ व्यंजने असून यातील माणसाच्या पाठकण्यातील एकेका मणक्याशी एकेका व्यंजनाचा संबंध आहे. माणसाच्या मणक्यांची संख्या सर्वत्र सारखी म्हणून जगातील कोणत्याही माणसाने उच्चारलेले कोणत्याही भाषेतील शब्द या लिपीत हुबेहूब लिहिता येतात. देवनागरी लिपीने सर्व जगाची भाषिक एकात्मता शक्य आहे.

या लिपीत लेखनाला कमी जागा, कमी कागद, कमी शाई लागते. कागदासाठीची जंगलतोड कमी होते, शाईतील शिशामुळे होणारे प्रदूषण कमी होते. देवनागरी लिपी पर्यावरणाचे संरक्षण करते.या लिपीच्या चिन्हांत थोडा बदल करुन बंगाली, गुजराती, कन्नड, पंजाबी, तमिळ, उडिया, तेलुगू, मल्याळी या लिप्यांतील चिन्हे निर्माण झाली. देवनागरी लिपी भारताच्या एकात्मतेचे प्रतिक आहे.

या लिपीतील अ ते ज्ञ अक्षरे व ० ते ९ अंक खूप देखणे असून बघताच आनंद देतात. कोणताही मजकुर या लिपीमुळे कमी जागेत व श्रमात लिहिता येतो. म्हणून ही लिपी आर्थिक बचत करते, पर्यावरण रक्षणाला हातभार लावते. ती भारतीय एकात्मतेचे साधन असून सर्वांनी घरी, बाजारात, बँकेत, व्यवसायात, प्रत्येक व्यवहारात देवनागरी लिपी वापरल्यास आपण अधिक सुखी, आनंदी होवू.

जगातील सर्वांना उपयुक्त असलेल्या गणेशविद्याची माहिती देशी, परदेशी, लोकांना देण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. परदेशी व्यवहारात इतर लिपीसोबत या लिपीचा अवश्य वापर करावा. आपल्या देशात येणाऱ्या मालावर जसा विविध लिपीतील मजकूर असतो त्याप्रमाणे भारतीय उद्योग/व्यावसायिकांनी बाजारात, बँकेत, कचेरीत, व्यवसायात, पत्रकात, पावतीत, प्रत्येक व्यवहारात तसेच वेष्टनावर देवनागरी लिपी वापरुन गणेशविद्येचा जगभर प्रसार करावा. शून्याची कल्पना, खगोल, भूमिती/ बीजगणिताचे सिध्दांत, औषधी अशा क्षेत्रातील मुलभूत गोष्टी भारताने यापूर्वी जगाला दिल्या. जगातील सर्वोत्तम लिपी गणेशविद्या जगाला देण्यासाठी तिचा भारतात आणि जगभर प्रसार करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

# नवरात्र उत्सव

नवरात्र हे एक महान व्रत आहे. शिवपत्नी पार्वती म्हणजेच आदिशक्ती कालिमाता. तिच्या अनेक रुपांपैकी दुर्गा हे एक अश्विन शुध्द प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हे व्रत प्रतिवर्षी करतात. अश्विन शुध्द प्रतिपदेस घरात अत्यंत शुचिर्भुत अशा जागी घटस्थापना करतात. एका तांब्याच्या कलशावर ताम्हण ठेवून त्यात मंडलाकार मुख्य देवता महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती यांची व त्यांच्या अनेक परिवार देवतांची स्थापना करतात. दुसरा एक तांब्याचा कलश शुध्द पाण्याने भरुन त्यात सुगंधी द्रव्ये, सव्वा रुपया व सुपारी ठेवतात. कलशाच्या मुखावर पाच आंब्याची पाने ठेवून त्यावर मध्यभागी नारळ ठेवतात. या कलशावर पायथ्याशी एका परडीत लाल माती टाकून त्यामध्ये नउ प्रकारची धान्ये पेरतात. या पेरलेल्याधान्यावर रोज पाणी शिंपडतात. ते छोटेसे शेत फुलुन आले की घटामध्ये धनधान्याची समृध्दी होते. अशी कल्पना आहे. देवीसमोर नंदादिप नउ दिवस अखंड पेटत ठेवतात. घटस्थापनेच्या दिवशी मातामह श्राध्द असते. त्या दिवशी नातवाच्या हातून दूध, केळ, दक्षिणा ठेवतात व घरोघरी घटस्थापना होते. काही जणांकडे नउ दिवस उपवासाचे पदार्थ खातात. तर काही जणांकडे धान्य फराळ असतो.

शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चन्द्रघंटा, कुस्मांडी, स्कंदमाता, कात्यायनी, महागौरी, सिध्दीदात्री अशी देवीची नउ रुपे आहेत. हे नउ दिवस ब्रह्मांडात वाईट शक्तींनी प्रक्षेपित केलेल्या त्रासदायक लहरी तसेच आदिशक्तीच्या मोहक व चैतन्यमय लहरींचे युध्द चालू असते. या वेळी ब्रह्मांडातील वातावरण तप्त झालेले असते व दुर्गादेवीच्या शस्त्रांतून तेजाची झळाळी अतिवेगात सुक्ष्म शक्तींवर हल्ला करत असते अशी कल्पना आहे.

अश्विन महिन्यात येणारा नवरात्र उत्सव म्हणजे भक्ती आणि शक्तीचा मिलाप असलेला आदिमायेचा, आदिशक्तीचा पारंपरिक उत्सव यालाच शारदीय नवरात्र असे म्हणतात. नवरात्रीतील नउ रुपे मनुष्यबळ, शांती, सुख, वैभव, निरोगी काया देणारी तसेच आर्थिक इच्छा पूर्ण करणारी असतात.

नवरात्रीच्या काळात महाराष्ट्रात मुली संध्याकाळी पाटावर हत्तीचे चित्र काढून त्याभोवती फेर धरतात व गाणी म्हणतात. यालाच भोंडला असे म्हणतात. त्या निमित्ताने सर्व बायका एकत्र जमतात. बंगालचा दुर्गा उत्सव नउ दिवस खूप हर्षोउल्हासात व धामधुमीत साजरा केला जातो. गुजरातमधील गरबा हा नृत्य प्रकार दांडियाच्या रुपाने भारतभर साजरा केला जातो.

अशा प्रकारे दहा दिवस विजयादशमी म्हणून साजरा करतात. अशा रितीने लहानांपासून मोठ्यांपर्यंत हवाहवासा वाटणाऱ्या नवरात्रोत्सवाचे नउ दिवस कधी संपतात कळतच नाही.

# देव

दगडातून देव बनविण्याचा
प्रयत्न मी केला
ना दगडातील देव जागृत झाला
ना सगुण आकार दगडाला आला ।
दगडात देव असतो हे फक्त
श्रध्देने मानायला हवे
एकांतात ध्यानात बसून
जाणायला हवे ।
ठाव लागल्यावर जाणवते
देव आपल्यातही आहे
शरीर, मन, बुध्दी यांनी
केलेला व्यवहार तो तटस्थ पाहे ।
नेहमी सूरालाच साथ
दिली पाहिजे
आत्मविश्वास आणि विवेकाने
असुरी विचारांवर मात केली पाहिजे।
वाटतं सर्वांना विदुरासारखे
वागता येईल काय
सर्वांच्याच घरी मग
देव ठेवेल पाय ।

**श्री. सुनिल हनवते,**
**माध्यमिक व तांत्रिक शिक्षण**

# दोघेही सारखेच

आई असते मायाळू पण बाप नसतो दुष्ट
आई सारखेच प्रेम करतो तो बाप दिसत नाही का स्पष्ट
आईची दिसते प्रेमळ माया
पण बापाची दिसत नाही का प्रेमळ छाया
आईचे दिसतात डोळ्यातील पाणी
पण बापाचे दिसत नाही का रक्ताचे पाणी
खाण्या-पिण्याचे मुलांचे आई करते लाड
पण त्याच मुलांच्या लाडासाठी
बापाचे कष्ट असतात जीवापाड
आई मुलांचे करते पालन पोषण संगोपन
पण त्याच आईवर प्रेम करतो बाप मनोमन
आई घर सांभाळते घरात राहून
पण त्याच आईला सांभाळतो बाप दूर राहून
तेंव्हा आई श्रेष्ठ का बाप श्रेष्ठ असा भेदभाव करु नका
एकच गाडीची दोन चाके आहेत
कोणीही पंक्चर करु नका..

**संजय वसंत देवळे,**
**पं.नेहरु स्टेडियम**

# शिक्षकदिन

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु मंत्र आहे हा आगळा ।
स्वागताचा सोहळा हा स्वागता सोहळा।
शिक्षक दिनाच्या शुभेच्छा बहु तुम्हा सर्वांना।
घडवा उद्याचे भावी नागरिक सुजाण, सुसंस्कृत हीच मनोकामना ।
बालपणी पाजूनी ज्ञानामृत, इथेच पोषिता जीवन ।
इथेच मिळते घट भरलेले, विद्येचे अभंग अक्षयधन ।
गुरुशिष्यांचे अतुट नाते विसरु नका हो मनी तयाते ।
बालकांना घडविणारा शिल्पकार तुम्हीच विसरु नका तयाते ।
गुरुच रेखितो भाळी विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या ओळी ।
जीवन त्यांचे सफल व्हाया पाजा ज्ञानामृताचे ज्ञान ।
मनांत नित बाळगतील तुमचा मंत्र महान ।
अजाण त्यांच्या मनांस द्या हो सुजाणतेचे भान ।
इथे नसते मोल घामाचे, मोती होतील घामाचे ।
प्रतीक रम्य शुभंकर आहे हे सरस्वतीच्या प्रेमाचे ।
मुग्ध ह्या कलिकांना निकोप फुलवायचे असते ।
हासत-खेळत शिक्षणामधूनी नितीमुल्ये रुजवायचे असते ।
अंकुरण्या बिजाला हवा असतो नित उनवारा ।
पाठिशी राहू द्या नित बालकांच्या मार्गदर्शनाचा आसरा ।
निरोप घेतो तुमचा पुन:श्च एकदा शुभेच्छा देवूनी ।

**सौ. अलका जोशी, सल्लागार (कामगार) कार्यालय**